|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
**जनसंपर्क विभाग** **Public Relations**

जळगाव दि.१६ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाद्वारे माहे मार्च/एप्रिल/मे-२०१९ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षांमध्ये गैरप्रकारात आढळून आलेल्या विद्यार्थ्यापैकी केस नं. २०१ ते ३०० या क्रमांकाच्या विद्यार्थ्यांचे म्हणने ऐकुण घेण्यासाठी शुक्रवार, दि. १९ जुलै,२०१९ रोजी परीक्षा गैरप्रकार चौकशी समितीची सभा आयोजित करण्यात आली होती. ही सभा पुढे ढकलण्यात आली असून आता ही सभा **शुक्रवार, दि.०२ ऑगस्ट , २०१९ रोजी विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीत सकाळी १० वाजता घेण्यात येणार आहे.**

या सभेस बोलविण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची तपशीलवार सूची विद्यापीठाच्या संकेत स्थळावरील (www.nmu.ac.in) Student Corner----Examination----Unfairmeans (copycase)/Lapses या सदराखाली उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या बदलाची संबंधीत विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी, असे आवाहन विद्यापीठाच्या परीक्षा व मुल्यमापन मंडळाचे संचालक बी.पी.पाटील यांनी केले आहे.

---

जा.क्र.उमवि/१६/परीक्षा-बातमी/हस्तदेय/२०१९ दि.१६ जुलै,२०१९

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,
-----------------------

महोदय,

उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिद्ध करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(प्रमोद आ.चव्हाण)
जनसंपर्क अधिकारी यांच्या करिता